REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

लोकसत्ता | मुंबई

'गोलिअथ'रूपी विकासासमोर पर्यावरणवादी 'डेव्हिड' हरले!

'आरे बचाव' मोहीम राबवणाऱ्यांबाबत उच्च न्यायालयाचे निरीक्षण

प्रतिनिधी, मुंबई

विकासाविरोधात कायदेशीर मागणे लढा देण्यात तसेच गुणवत्तेच्या बाबतीत कमी पडल्याने पर्यावरणवादी हरले, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने 'आरे बचाव' मोहीम राबवणाऱ्या पर्यावरणवाद्यांच्या तोंडचा घास प्रकल्पाबाबत निरीक्षण नोंदवले.

आरेतील मेट्रो-३ प्रकल्पाच्या कारशेडसाठी वृक्ष हटवण्यास हिरवा कंदील दाखवताना मुख्य न्यायमूर्ती प्रदीप नंद्रजोग आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने आरेसंदर्भात दाखल विविध याचिका शुक्रवारी फेटाळल्या. त्या वेळी न्यायालयाने पर्यावरणवादी कसे आणि कुठे कमी पडले याची कारणमीमांसा केली. विशेष म्हणजे न्यायालयाही ही कारणमीमांसा करताना बायखलमधील डेव्हिड (सामान्य) आणि गोलिअथच्या (भव्य) गोष्टीचा दाखला दिला. त्यानुसार पर्यावरणप्रेमींना न्यायालयाने 'डेव्हिड्स'ची, तर विकासाला 'गोलिअथ' उपमा दिली. माणसाचे निसर्गाशी अस्सलेले नाते आणि पर्यावरणाविषयीचे प्रेम ही एकमेव भावना सत्य आहे. उर्वरित सगळी नाती ही तात्पुरती वा खोटी आहेत, अशी विश्वासाने आणि निष्ठेने पर्यावरणवादी काम करत आहेत. आताच्या त्यांच्या विकासविरोधातील लढाईत डेव्हिड्स (पर्यावरणवादी) हे मोठ्या धैर्याने आणि सत्याने लढा देत असले तरी त्यांचा हा लढा दिशाहीन, एकाकी, तोकडा आहे, असे निरीक्षण न्यायालयाने निकालात नोंदवले.



वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाला विरोध करणारी याचिका असो, आरेला वन म्हणून जाहीर करण्याची मागणी असो या सगळ्या याचिकांमध्ये पर्यावरणवादी कायदेशीर मागणे लढा देण्यात कमी पडले. प्राधिकरणाची निर्णय प्रक्रिया ही पारदर्शी आणि कारणांवर आधारित आहे. याउलट लढ्याची दिशा चुकली म्हणून नाही, तर गुणवत्तेच्या कसोटीवर पर्यावरणवादी खरे उतरू शकल्याने त्यांना अपयश आल्याचेही न्यायालयाने म्हटले. आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पार न पाडताच घाईघाईत केलेल्या याचिका या कार्यवाह्या कसोटीवर खऱ्या उतरत नाहीत. आरेसंदर्भातील याचिकांही याच पद्धतीने करण्यात आल्याचेही न्यायालयाने नमूद केले.

आपला हा मुद्दा पटवून देताना न्यायालयाने आरे हे वन म्हणून जाहीर करण्याचा 'वनशक्ती' या स्वयंसेवी संस्थेने केलेला याचिकेचा दाखला दिला. या प्रकरणी उच्च न्यायालयाने आधीच निकाल दिलेला आहे. शिवाय प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यानंतरही संस्थेने न्यायालयाच्या अन्य खंडपीठाने या याचिका कोणते निकाल दिले त्यात आरेचा प्रकरणी निकाल दिला त्यात आरेचा मुद्दा समाविष्ट नव्हता. राष्ट्रीय हरित लवादाकडे या मुद्दय़ावर सुनावणी सुरू होती. मात्र संस्थेने तेथून अर्ज मागे घेत उच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिकेद्वारे हा मुद्दा उपस्थित केला. न्यायालयानेही तो मूळ याचिकेवर निकाल देताना विचारात घेतला आणि आरे हे वन नाही असा निर्वाळा दिला. परिणामी, आता हे 'प्रकरण आपल्यासमोर सुनावणीस येऊनही याचिकाकर्त्यांनी चालून ठेवलेल्या याचिकांपैकी आपले हात बांधले गेल्याचे घोळामुळे आपले हात बांधले गेल्याचे न्यायालयाने म्हटले. प्राधिकरणाचा निर्णयावरीलच याचिकेबाबतही न्यायालयाने म्हटले. प्राधिकरणाचा निर्णयावरीलच याचिकाकर्ते कमी पडल्याचे न्यायालयाने नमूद केले.

नायर रुग्णालयात पुन्हा रॅगिंग?

समितीला रुग्णालय प्रशासनाकडून अर्धवट माहिती

शैलजा तिवले, मुंबई

डॉ. पायल तडवी आत्महत्या प्रकरणानंतर चारच महिन्यांत नायर रुग्णालयात एका वरिष्ठ आणि कनिष्ठ डॉक्टर विद्यार्थिनींमधील वाद समोर आल्याने पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. रुग्णालय प्रशासनाने हा वाद रॅगिंग समितीसमोर मांडला. मात्र ज्या विभागात हा प्रकार घडला त्या विभागाच्या प्रमुखांकडून पुरेशी माहिती देण्यात न आल्याने समितीचे चौकशीचे घोडे पुढे सरकलेले नाही.

नायर वैद्यकीय महाविद्यालयातील कान, नाक, घसा विभागांतील पदव्युत्तरच्या पहिल्या वर्षांची विद्यार्थिनी डॉ. सादिया शेख तडवी आणि तिची वरिष्ठ सहकारी डॉ. रेश्मा बांगर या डॉ. मिलिंद नवलाखे यांच्या विभागामध्ये काम करतात.

दोन्ही डॉक्टरांमध्ये कामावरून वाद झाला. त्यानंतर डॉ. तडवी यांनी कामाचा त्रास होत असून याबाबत तुमची तक्रार वरिष्ठांकडे करेन, अशी धमकी डॉ. बांगर यांना दिली. यामुळे चिडलेल्या डॉ. बांगर यांनी १२ सप्टेंबर रोजी स्वत:ला वसतिगृहातील खोलीत कोंडून घेतल्याची चर्चा आहे. जवळपास तीन दिवस कोंडून घेतल्यानंतर वरिष्ठ डॉक्टरांना या घटनेबाबत समजले. त्यानंतर डॉक्टरांनी त्यांची समजूत काढली

तपिशीलअभावी चौकशी रखडली

डॉ. बांगर हिने स्वत:ला कोंडून घेतल्याची माहिती विभागप्रमुखांनी मला दिलेली नाही.

विभागप्रमुखांनी दिलेल्या कागदपत्रांमध्येही याबाबत माहिती नाही, अशी माहिती डॉ. मारमल यांनी दिली. तसेच समितीला या प्रकाराबाबत कोणतीही माहिती विभागप्रमुखांनी कळवलेली नाही.

आणि मानसोपचार विभागामध्ये दाखल करून उपचार केले.

दरम्यान, विभागप्रमुख डॉ. बच्छी हाथिरम यांनी रॅगिंगविरोधी समितीला या घटनेबाबत १७ सप्टेंबरला पत्राद्वारे कळवले. परंतु दोन्ही डॉक्टरांमध्ये नेमका काय वाद झाला, याबाबत कोणताही उल्लेख पत्रात केला नाही. त्यामुळे रॅगिंग झाले की नाही याचे तपशील समितीसमोर येऊ शकले नाहीत. २३ सप्टेंबरला समितीच्या पहिल्या बैठकीत प्रकरणाची सविस्तर माहिती लेखी स्वरूपात देण्याचे आदेश देण्यात आले. परंतु मुदत उलटली तरी विभागप्रमुखांनी समितीकडे माहिती सादर केलेली नाही.

दोन्ही विद्यार्थिनींमध्ये वाद झाल्यानंतर समुपदेशन केले आहे. त्यांच्यातील वाद सोडवले असून पालकांशीही विभागप्रमुखांनी संवाद साधला आहे. प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून आम्ही रॅगिंग समितीला या घटनेची माहिती देऊन पुढील तपास करण्यास सांगितले, असे रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. रमेश भारमल यांनी सांगितले. विद्यार्थिनी कोणतीही सूचना न देता हजर होत नाही, असे लक्षात आल्यावर चौकशी करणे ही युनिटप्रमुखांची जबाबदारी आहे. परंतु डॉ. बांगर हिच्या गैरहजेरीची दखलच घेतली गेली नाही.

जॉय थॉमस अटकेत

वाधवान पितापुत्र पोलीस कोठडीत

खास प्रतिनिधी, मुंबई

पंजाब अँण्ड महाराष्ट्र को-ऑपरेटीव्ह बँकेचे (पीएमसीबी) माजी व्यवस्थापकीय संचालक जॉय थॉमस यांना शुक्रवारी आर्थिक गुन्हे विभागाने अटक केली. बँकेच्या कर्ज घोटाळ्याप्रकरणी गुन्हा नोंद झाल्यापासून तपास पथकाला चकवणाऱ्या थॉमस यांनी शुक्रवारी शरणागती पत्करली.

एचडीआयएलचे अटकेत असलेले प्रवर्तक राकेश वाधवान आणि त्यांचे पुत्र सारंग यांना न्यायालयाने शुक्रवारी ९ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. कर्ज घोटाळ्याशी थेट संबंध आहे, हे स्पष्ट करणारे पुरावे, दुर्वे हाती असल्याचा दावा तपास पथकाने न्यायालयात केला. तसेच या कंपनीने बँकेकडे तारण ठेवलेली ३५०० कोटींची मालमत्ता गोठवल्याची माहितीही दिली.

या प्रकरणाची दखल सक्तवसुली

पीएमसीबी बँक घोटाळा


संचालनालयने (ईडी) घेत तपास सुरू केला. बँक, एचडीआयएलशी संबंधीत ईडीने शुक्रवारी सहा ठिकाणी छापे घातले.

आर्थिक निर्बंध आणल्यानंतरच्या चौकशीत बँकेचे संचालक मंडळ आणि एचडीआएलचे प्रवर्तकांचा कर्ज घोटाळा पुढे आला. एचडीआयएल कंपनीला बँकेने टप्प्याटप्प्याने ४३५५ कोटींचे कर्ज वाटप केले होते. कंपनी हे कर्ज फेडू शकणार नाही याची जाणीव असूनही बँकेने कर्जवाटप सुरूच ठेवले. बँकेने ही कर्ज खाती अनुत्पादक म्हणून जाहीर केली नाहीत आणि या खात्यांतील व्यवहार रिझर्व्ह बँकेपासून दडवले. अशी एकूण ४४ खाती उजेडात आली. त्यापैकी १० खाती एचडीआएल समूहाच्या विविध कंपन्यांची आहेत. उर्वरीत ३४ खाती एचडीआयएल प्रवर्तकांनी निर्माण केलेल्या बनावट कंपन्यांची आहेत. या कर्ज खात्यांवरील व्यवहार दडवण्यासाठी बँकेने २१ हजारांहून अधिक बनावट खाती तयार केली. एचडीआएलशी संबंधित कर्ज खात्यांबाबत रिझर्व्ह बँकेला माहिती मिळाली असती तर दिवाळखोरीच्या प्रक्रियेत कंपनी गुरफटली असती. तसे होऊ नये म्हणून बँकेने बनावट खात्यांचा आभास निर्माण केला.

रविवारी मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक

पश्चिम रेल्वेवर आज मध्यरात्री ब्लॉक

प्रतिनिधी, मुंबई



सोडण्यात येणार आहेत.

येत्या रविवारी मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर माटुंगा ते मुलुंड डाऊन धीमा मार्ग, आणि हार्बरवर पनवेल ते वाशी दोन्ही मार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे. तसेच पश्चिम रेल्वेवर ५ ऑक्टोबरला मध्यरात्री वसई रोड ते भाईंदर दरम्यान दोन्ही जलद मार्गावर ब्लॉक असेल, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली.

मध्य रेल्वे-मुख्य मार्ग

कुठे - माटुंगा ते मुलुंड डाऊन धीमा मार्ग

कधी - स. ११.२० ते दु. ३.५० वा.

परिणाम- डाऊन धीमा मार्गावरील लोकलगाडी रेल्वे माटुंगा ते मुलुंडपर्यंत जलद मार्गावर धावतील. सायन, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप, मुलुंड स्थानकात जलद रेल्वे थांबतील. विद्याविहार, कांजुरमार्ग आणि नाहूर स्थानकातील डाऊन धीमा मार्गावर उपनगरी रेल्वे थांबणार नाहीत. सायंकाळी पाच वाजेपर्यंत गाड्या पंधरा ते तीस मिनिटे उशिराने धावणार आहेत.

हार्बर मार्ग

कुठे - पनवेल ते वाशी दोन्ही मार्ग

कधी- स.११.३० ते सायं. ४.०० वा

परिणाम- सीएसएमटी ते बेलापूर, पनवेल मार्गावर उपनगरी रेल्वे रद्द करण्यात आल्या आहेत. तसेच पनवेल ते ठाणे सकाळी १०.१२ ते दु. ३.५३ आणि ठाणे ते पनवेल सकाळी ११.०४ ते दु. ३.२० पर्यंत व पनवेल ते अंधेरी लोकल फेऱ्याही रद्द केल्या आहेत. सीएसएमटी ते वाशीपर्यंत विशेष लोकल फेऱ्या

'इरेडीयम'चे आमीष दाखवून फसवणारी टोळी अटकेत

मुंबई : कॉपर इरेडीयम हा दुर्मीळ व महागडा धातू स्वस्तात विकण्याचे आमीष दाखवून अनेक व्यावसायिक, उद्योजकांना कोट्यवधींचा गंडा घालणाऱ्या पाच जणांच्या टोळीला गुन्हे शाखेच्या कांदिवली कक्षाने अटक केली.

इस्त्रो, नासासारख्या अवकाश संशोधनाशी संबंधीत यंत्रणांना या धातूची गरज असते. हा दुर्मीळ धातू खरेदी करून विकल्यास कोट्यवधींचा फायदा होईल, असे आमीष या टोळीने मुंबई, नवीमुंबईतील व्यावसायिकांना दाखवले होते. कोट्यवधींचा फायदा पाहून अनेक गुंतवणूकदार या टोळीच्या जाळ्यात अडकले. त्यापैकी नवीमुंबईतील एका व्यावसायिकाने सव्वा कोटी रुपये गुंतवले होते. फसलेल्या बहुतांश व्यक्ती बदनामीच्या भीतीने तक्रार देण्यास पुढे

बीएआरसी हॉस्पिटल
अणुऊर्जानगर, मुंबई-९४

वॉक-इन-इंटरव्ह्यू

स्थानापन्न तत्त्वावर डेंटल हायजिनिस्ट व डेंटल टेक्निशियनच्या पदाकरिता ०९.१०.२०१९ रोजी वॉक-इन-इंटरव्ह्यूचे आयोजन करण्यात येणार आहे. हजर राहण्याची वेळ: दु. १२.०० वा. अधिक तपशिलाकरिता कृपया www.barc.gov.in या बीएआरसीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

बीएआरसी हॉस्पिटल
अणुऊर्जानगर, मुंबई

वॉक-इन-इंटरव्ह्यू

खालील पदांकरिता शुक्रवार, ११ ऑक्टोबर, २०१९ रोजी बीएआरसी हॉस्पिटल येथे वॉक-इन-इंटरव्ह्यूचे आयोजन केले जाणार आहे:
- विविध विद्याशाखांमधील फोर्ट इंजीयर रेसि. मेडि. ऑफिसर
- आरएमओ (आयसीयू/मेडि.)
- विविध विद्याशाखांमधील जेआरडी/एसआरडी (नॉन डीएनबी)

हजर राहण्याची वेळ: स. ०८.३० वा. तपशिलाकरिता कृपया www.barc.gov.in या बीएआरसीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: एक्स्चेंज स्क्वेअर, सूरज रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३.
CIN: U74999MH2008PLC185349;
ईमेल: ig-mcxccl@mcxccl.com
वेबसाईट: https://www.mcxccl.com

सूचना

सिक्युरिटीज कॉन्ट्रॅक्टस् (रेग्युलेशन) (स्टॉक एक्स्चेंजेस अँड क्लिअरींग कॉर्पोरेशनस्) रेग्युलेशन्स, २०१८, च्या नियम ३३ आणि सेबी (डिस्क्लोजर आँड्स्क्लोजर्स रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५, च्या नियम ४७ च्या अनुरोधाने सूचित करण्यात येते की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मंगळवार, दिनांक १५ ऑक्टोबर २०१९ रोजी मुंबई येथे, इतर विषयांबरोबर, कंपनीच्या ३० सप्टेंबर २०१९ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाही करीता अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेणे व मंजूर करणे यासाठी घेण्यात येणार आहे.

उल्लेखित सूचना, कंपनीचे संकेतस्थळ https://www.mcxccl.com/disclosures/announcement वर उपलब्ध आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड करीता
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई

सिडकोच्या घरांची सोडत २६ नोव्हेंबरला

विशेष प्रतिनिधी, नवी मुंबई

सिडकोच्या महागृहनिर्मितीतील नऊ हजार आणि जुन्या स्वप्नपूर्ती गृह संकुलातील आठशे घरांची सोडत २६ नोव्हेंबर रोजी काढण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीमुळे या गृहयोजनेत अर्ज करण्याची मुदत ५ नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे दहा हजार नागरिकांचे ऐन दिवाळीत घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

सिडकोने एकूण दोन लाख घरनिर्मितीची घोषणा केली आहे केंद्र सरकारच्या २०२२ पर्यंत सर्वांसाठी घर या योजनेतील हा एक भाग आहे. त्यानुसार गेल्या वर्षी १४ हजार ७३८ घरांची सोडत आणि बांधकाम सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर यंदा सिडकोने ९५ हजार घरांची घोषणा केली असून, त्यातील पहिल्या टप्प्यातील ९ हजार २४९ घरांची अर्ज नोंदणी सुरू करण्यात आली आहे. त्याची मुदत १८ ऑक्टोबर होती. त्याऐवजी ती आता ५ नोव्हेंबर रोजी करण्यात आली आहे. सिडकोने जुन्या स्वप्नपूर्ती गृहसंकुलातील सिल्व्हर ८१४ घरांची विक्रीसुद्धा सुरू केली आहे. त्यांची मुदत ५ ऑक्टोबर रोजी संपत होती त्याऐवजी ती ५ नोव्हेंबर करण्यात आली आहे. त्यामुळे दोन्ही योजनांचे अर्ज नोंदणी ५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ आहे. या दोन्ही योजनांतील घरांची सोडत २६ नोव्हेंबर रोजी होणार असून या दोन्ही योजनांसाठी ७० हजार अर्ज नोंद झाले आहेत.

अधिष्ठात्यांना राज्यभरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात शस्त्रक्रिया करण्याची परवानगी


वैद्यकीय शिक्षण विभागाचा निर्णय

प्रतिनिधी, मुंबई

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांना आता राज्यातील कोणत्याही इतर शासकीय महाविद्यालयांत वैद्यकीय सेवा देणे शक्य होणार आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाने या निर्णयास मंजुरी दिल्याचे परिपत्रक जाहीर केले आहे.

वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अधिष्ठातापदावर कार्यरत असलेले डॉक्टर त्यांच्या विषयांमध्ये तज्ज्ञ असतात, परंतु या पदावरील प्रशासकीय जबाबदाऱ्यांमुळे त्यांना वैद्यकीय सेवा देणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांच्या ज्ञानाचा उपयोग केला जात नाही.

इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये जाऊन शस्त्रक्रिया करणे किंवा वैद्यकीय सेवा देण्यास



वैद्यकीय शिक्षण विभागाची परवानगी घेणे त्यांना बंधनकारक आहे. परंतु आता विभागाने या नियमांमध्ये बदल करत राज्यातील कोणत्याही शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये शस्त्रक्रिया करण्याची परवानगी दिली असल्याचे या परिपत्रकामध्ये नमूद केले आहे.

"वैद्यकीय क्षेत्रात अनेक वर्षे काम केल्यानंतर अधिष्ठातापदी नियुक्ती होते. इतक्या वर्षांत आलेल्या वैद्यकीय अनुभवाचा वापर मात्र अधिष्ठातापदी आल्यानंतर करणे शक्य होत नाही. तेव्हा या ज्ञानाचा वापर करत अन्य विद्यार्थ्यांना शिकविणे, वैद्यकीय शस्त्रक्रिया करणे याही संधी अधिष्ठात्यांनाही मिळणे आवश्यक आहे, या उद्देशातून हा निर्णय घेण्यात आला आहे.

- डॉ. अजय चंदनवाले,
वैद्यकीय शिक्षण विभागाचे अतिरिक्त संचालक

महाराष्ट्र शासन पुरस्कृत व राज्य औद्योगिक महामंडळाचा संयुक्त उपक्रम "MCED" आयोजित

MCED

डिजीटल मार्केटींग

दिनांक १ : संपूर्ण वर्ष ज्ञानविस्तार आधारित २) शासकीय कर्ज - सबसिडी योजनेची माहिती ३) नवीन उद्योग व्यवसाय सुरु करण्याची माहिती-वैयक्तिक मार्गदर्शन ४) ज्ञानात पुरस्कृत "MCED" चे महत्त्वपूर्ण प्रमाणपत्र

- UDYOG AADHAR • CMEGP SCHEME FOR MANUFACTURING AND SERVICE SECTOR
- VARIOUS GOVT SUBSIDIES SCHEME
- GOVERNMENT CERTIFICATE
- PERSONALITY DEVELOPMENT
- HOW TO GET BANK SUPPORT FOR FINANCE
- INCREASE ENTREPRENEURS CHARACTER
- HOW TO INCREASE ENTREPRENEURS CHARACTER

संपर्क - सुहासी तोइलकर 98209 23312 / सुनी कदम 8691007701

महाराष्ट्र

असेल तुमच्यात स्वाभिमान, विकू नका मतदान.

रोख किंवा मूल्यवान वस्तूंच्या देवाण घेवाण विषयी कोणतीही माहिती खालील टोल फ्री नम्बर वर देती जाऊ शकते.

टोल फ्री नम्बर
१८०० २२ १५९०

वॉट्सॲप नम्बर
९३७८७२७८२३
९३७८७२७८२४

निवडणूक २०१९

निवडणुक आणि आयकर विभाग यांच्या तर्फे जनहितार्थ प्रसारित

महानगर गॅस लिमिटेड
(सी.जी.एम.एल.)
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, प्लॉट क्र. जीई-१, सत्पे-अंधेरी महामार्ग, सातपे (पूर्व), मुंबई ४०००७५
दूरध्वनी: २५९ ६५५८/४०००
ई-मेल: investorrelations@mahanagargas.com
वेबसाईट: https://www.mahanagargas.com

25

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही व अर्ध वर्षाकरिता कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष, इतर गोष्टींसमवेत विचारात घेण्याकरिता व मान्य करण्याकरिता कंपनीच्या संचालक मंडळाची सभा **सोमवार, ११ नोव्हेंबर, २०१९** रोजी घेण्यात येणार आहे.

यासंबंधित ट्रेडिंग विंडो याआधीच सर्व प्रदनिर्दीष्ट व्यक्तींकरिता **मंगळवार, ०१ ऑक्टोबर, २०१९** पासून बंद ठेवण्यात आली होती. सदर विंडो ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाही व अर्ध वर्षाकरिता कंपनीचे वित्तीय निष्कर्ष घोषित झाल्यानंतर ४८ तासांपर्यंत बंद ठेवण्यात येईल.

ही सूचना **www.mahanagargas.com** या कंपनीच्या संकेतस्थळावर आणि स्टॉक एक्स्चेंजेसच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.bseindia.com** व **www.nseindia.com** यावर, जेथे कंपनीचे समभाग मान सूचिबद्ध करण्यात आले आहेत, पाहता येईल.

महानगर गॅस लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
आनंद उपाध्याय
कंपनी सचिव व कॉम्प्लायन्स ऑफिसर

तारीख : ०४ ऑक्टोबर, २०१९
स्थळ : मुंबई

रविवार, दि. ०६/१०/२०१९ रोजी मेगा ब्लॉक

मध्य रेल्वेच्या मेन लाईन आणि हार्बर मार्गावर अनुरक्षण कार्य करण्यासाठी रविवार, **रविवार दि. ०६/१०/२०१९ रोजी खालीलप्रमाणे मेगा ब्लॉक** परिचालित करण्यात येईल.

माटुंगा-मुलुंड डाऊन धीमा मार्गावर सकाळी ११.२० ते दुपारी ३.५० पर्यंत

- माटुंगा येथून सकाळी १०.५७ पासून दुपारी ३.५२ वाजेपर्यंत प्रस्थान करणाऱ्या डाऊन धीमा मार्गावरील माटुंगा आणि मुलुंड स्थानकांदरम्यान डाऊन जलद मार्गावर वळविण्यात येतील आणि शीव, कुर्ला, घाटकोपर, विक्रोळी, भांडुप व मुलुंड या स्थानकांवर थांबतील आणि पुढे मुलुंड स्थानकानंतर डाऊन धीमा मार्गावर वळविण्यात येईल.
- डाऊन धीमा मार्गावरील गाड्या विद्याविहार, कांजूमार्ग आणि नाहूर स्थानकांवर उपलब्ध नसतील. या स्थानकांवरील प्रवाशांना घाटकोपर, भांडुप आणि मुलुंड स्थानकांवरून प्रवास करण्याची अनुमति आहे.
- कल्याणहून सकाळी १०.५५ पासून दुपारी ३.०६ वाजेपर्यंत प्रस्थान करणाऱ्या अप जलद/सेमी जलद मार्गाच्या गाड्या आपापल्या निर्धारित थांबा व्यतिरिक्त दिवा, मुलुंड, भांडुप, विक्रोळी, घाटकोपर आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील व आपल्या गंतव्य स्थानकांवर निर्धारित वेळेपेक्षा १५ मिनिटे उशीरा पोहोचतील.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.४८ पासून दुपारी ३.४० वाजेपर्यंत प्रस्थान करणाऱ्या डाऊन जलद/सेमी जलद मार्गावरील गाड्या आपल्या निर्धारित थांबा व्यतिरिक्त घाटकोपर, विक्रोळी, भांडुप, मुलुंड आणि दिवा स्थानकांवर थांबतील व आपल्या गंतव्य स्थानकांवर निर्धारित वेळेपेक्षा २० मिनिटे उशीरा पोहोचतील.
- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी ११.०० वाजल्यापासून सायं. ५.०० वाजेपर्यंत आगमन/प्रस्थान करणाऱ्या सर्व डाऊन आणि अप धीम्या गाड्या आपल्या गंतव्य स्थानकांवर निर्धारित वेळेपेक्षा १० मिनिटे उशीरा पोहोचतील.

पनवेल आणि वाशी दरम्यान अप तरांचे डाऊन हार्बर लाईनवर सकाळी ११.३० वा. पासून सायं. ४.०० वा. पर्यंत

- छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई येथून सकाळी १०.०३ ते दुपारी ३.१६ पर्यंत बेलापूर/पनवेल करिता सुटणाऱ्या डाऊन हार्बर सेवा व बेलापूर/पनवेल येथून सकाळी ११.०५ ते सायं. ४.०१ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई करिता सुटणाऱ्या अप हार्बर सेवा रद्द राहतील.
- सकाळी १०.१२ पासून दुपारी ३.५२ वाजेपर्यंत ठाण्यासाठी पनवेलहून प्रस्थान करणाऱ्या अप ट्रांसहार्बर मार्गाच्या गाड्या आणि सकाळी ११.४४ पासून दुपारी ३.२० वाजेपर्यंत पनवेलसाठी ठाणेहून प्रस्थान करणाऱ्या डाऊन ट्रांसहार्बर मार्गाच्या गाड्या रद्द असतील.
- ब्लॉक अवधीत पनवेल - अंधेरी सेवा रद्द राहतील.
- तथापि, ब्लॉक अवधीत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई ते वाशी दरम्यान विशेष सेवा चालवल्या जातील
- ब्लॉक अवधी दरम्यान ठाणे - वाशी / नेरुळ स्थानकांदरम्यान ट्रान्स हार्बर सेवा उपलब्ध राहतील.

या ब्लॉकमुळे, उपनगरीय गाड्यांमध्ये नेहमीपेक्षा अधिक गर्दी असू शकते. प्रवाशांना प्रवास करताना कोणतेही थोका न घेण्याची विनंती केली जाते व तोकल डब्यांच्या फूटबोर्ड व छतावर प्रवास करने टाळावे ही विनंती केली जाते. हे स्वरक्षाय मेगा ब्लॉक मुलभूत संरक्षण आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहेत. **होणाऱ्या गैरसोयीबद्दल प्रवाशांनी रेल्वे प्रशासनास सहकार्य करावे.**

मध्य रेल्वे
www.cr.indianrailways.gov.in
centralrailwayindia | Central_Railway | Central_Railway

संरक्षण मंत्रालय, भारत सरकार
माजी सैनिक कल्याणकारी विभाग
पुनर्वसन महासंचालनालय
ई-बोलीच्या निर्मत्रणाकरिता सूचना

१. पुनर्वसन महासंचालनालय संपूर्ण भारतातील भारतीय सेना दलाच्या निवृत्त होत असलेल्या / निवृत्त झालेल्या अधिकारींकरिता वि. य. : २०२०-२१ व २०२१-२२ करिता पुनर्वसन प्रशिक्षण कार्यक्रम म्हणून व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता सरकारी संस्था / विद्यापीठे / स्वायत्त संस्था / खासगी संस्थांकडून ऑनलाइन बोली मागवीत आहेत.
२. संपूर्ण तपशिलाकरिता कृपया https://www.defproc.gov.in यावरून किंवा https://www.dgrindia.com/directorate/training.html या पुनर्वसन महासंचालनालयाच्या संकेतस्थळावरील सद्य सूचनेवरून सविस्तर कागदपत्रे डाऊनलोड करावीत.
३. प्रस्तावाच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख ०६ नोव्हेंबर २०१९ आहे.

मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरींग कॉर्पोरेशन लिमिटेड करिता
नरेंद्र अहलावत
व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण: मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय: ५, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, मार्गी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी- २२७५९१०० फॅक्स: २२८८७५२४
फोर्ट कार्यालय : बॅक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४०००० १
दूरध्वनी : २२६७०२१०/१४८/२४८, २२१८२२२२. फॅक्स: २२६७३९१५
ई-मेल - sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाइट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक : एमआयएस-०४१९/सीआर-१६/२०१९/तीव्र
विषय : महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा २०१९ संयुक्त पेपर क्रमांक १, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१९

-: प्रवेशपत्रांकरिता उपलब्ध सूचना :-

(१) परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या ऑनलाइन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून प्रिंट केलेले मूळ स्वरूपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.
(२) परीक्षेसाठी दिलेले उपकेंद्रावर परीक्षा सुरू होण्याच्या वेळेपूर्वी दीड तास अगोदर हजर राहणे अनिवार्य असून परीक्षा कक्षातील शेवटच्या प्रवेशासाठी प्रवेश प्रमाणपत्रावर विहित केलेला वेळेनंतर कोणत्याही उमेदवारास प्रवेश अनुज्ञेय नाही.
(३) ओळखीचा पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्टकार्ड प्रकारचे इत्यादि लायसन्स यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र तसेच, उमेदवाराचे छायाचित्र व इतर मजकूर सुस्पष्टपणे दिसेल अशी मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य आहे.
(४) परीक्षा कक्षात मोबाइल दूरध्वनी अथवा इतर कोणतेही दूरसंचार साधन घेऊन जाण्यास परवानगी नाही.
(५) उपकेंद्रावर आवारामध्ये मित्र, नातेवाईक अथवा पालकांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश अनुज्ञेय नाही.
(६) प्रश्नपुस्तिका, उत्तरपत्रिका तसेच प्रवेश प्रमाणपत्रावर दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करून तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.
(७) उत्तरपत्रिकेवर परीक्षेचे नाव, बैठक क्रमांक, संच क्रमांक, विषय सांकेतांक इत्यादी तपशील योग्य प्रकारे नमूद करावा.
(८) परीक्षा कालावधीत कोणत्याही प्रकारे गैरप्रकार करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे अढळून आल्यास अथवा आयोगाच्या कोणत्याही सूचनांचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिबंधकारी कारवाई केली जाईल. तसेच, प्रचलित नियम/कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

**परीक्षेसाठी सर्व उमेदवारांना ह